महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
प्राप्त झालेले व्दितीय अपील

अपील क्रमांक : १२८/२०२२

अपिलार्थी—श्री. नामदेव मानिकराव शेडमाके

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी,
शिक्षण विभाग (प्राथमिक),जिल्हा परिषद, चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर

प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ३०.०१.२०२४

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित (प्रतिनिधी) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित (प्रतिनिधी) |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचादिनांक |
|---|---|---|---|
| १२.०८.२०२१ | २२.०८.२०२१ (हस्तांतरीत) | १२.१०.२०२१ | २२.१०.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि.१२.०८.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "श्री. अमर कुंटावार, वरिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, चंद्रपूर व श्री. प्रफुल्ल चव्हाण, कनिष्ठ सहाय्यक, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. चंद्रपूर यांचे दि. ०७.०५.२०१८ ते दि. ११.०५.२०१८ या कालावधीतील दैनंदिनी / रोजनिशी व प्रवास भत्ता देयकाची प्रत व सहप्रतीत इतर जोडलेल्या कागदपत्रासह " माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जि.प. चंद्रपूर यांनी दिनांक २०.०८.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, शिक्षण (प्रा.) विभाग/ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर यांचे कडे कलम ६(३) नुसार हस्तांतरीत केला व त्याची प्रतिलिपी अपिलार्थीस दिलेलीआहे. तदनंतर अपिलार्थी यांनी **दि. १२.१०.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "मागितलेली माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद

करून प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), जि.प. चंद्रपूर यांनी दि. २२.१०.२०२१ रोजी सुनावणी घेवून, "अपिलार्थीने सादर केलेला माहिती अधिकार अंतर्गत अर्ज शिक्षण विभाग (प्राथ.), जिल्हा परिषद, चंद्रपूर व ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. चंद्रपूर यांचे कार्यालयाशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी यांनी सदर अर्ज विहित मुदतीत संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतरित केला असून, सदर कार्यवाही माहिती अधिकार अधिनियम २००५चे कलम ६ (३) प्रमाणे योग्य असल्याने अपील खारीज करण्यात येत आहे. तसेच सदर माहितीबाबत अपिलार्थीने शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद, चंद्रपूर व ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. चंद्रपूर येथील प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल करावी", असे आदेशित करून अपील निकाली काढले आहे. त्यानुसार अपिलार्थी यांनी दिनांक ०१.११.२०२१ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प. चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून आदेश पारीत केल्याचे दिसून येत नाही.

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दि. १७.०१.२०२२** रोजी "मागितलेली माहिती मिळाली नसल्याने" असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दि. १७.०१.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दि. ३०.०१.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी, श्री. नामदेव मानिकराव शेडमाके उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे श्री. संदीप बुरेले, वरिष्ठ लिपिक, समग्र शिक्षा, जिल्हा परिषद, चंद्रपूर उपस्थित आहेत..

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरून असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दिनांक १२.८.२०२१ रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जान्वये, अमर कुंटावार, वरिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, चंद्रपूर व श्री. प्रफुल्ल चव्हाण, कनिष्ठ सहाय्यक, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. चंद्रपूर यांचे दि. ०७.०५.२०१८ ते दि. ११.०५.२०१८ या कालावधीतील दैनंदिनी / रोजनिशी व प्रवास भत्ता देयकाची प्रत मागितली असता, या प्रकरणात अद्यापपावेतो माहिती प्रदान करण्यात आलेली नसल्याचे अपिलार्थी यांनी नमूद केले आहे. अश्याच स्वरुपाचा माहिती अर्ज अपिलकर्ता यांनी सामान्य प्रशासन विभाग, जि. प. चंद्रपूर यांचेकडे दाखल केलेला असता, याबाबतीत तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), जि.प. चंद्रपूर यांनी दि. २२.१०.२०२१ रोजी सुनावणी घेवून सदर माहितीबाबत अपिलार्थीने शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद, चंद्रपूर



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते

व ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. चंद्रपूर येथील प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल करावी", असे आदेशित करून अपील निकाली काढले आहे. त्याअनुषंगाने अपिलार्थी श्री. शेडमाके यांनी दिनांक ०१.११.२०२१ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प. चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्याअनुषंगाने कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचे आढळून येते. यातील दुसऱ्या कर्मचाऱ्याची आवश्यक माहिती मिळालेली असून त्यात श्री. प्रफुल्ल चव्हाण कनिष्ठ सहायक हे दिनांक ०७.०५.२०१८ ते ११.०५.२०१८ या कालावधीत लाचलुचपत प्रतिबंधक पथकाकडे कार्यालयीन कामाकरीता असल्यामुळे उक्त कालावधीतील दैनंदिनी/रोजनिशी व प्रवासभत्ता सादर केलेला नाही करीता सदरची माहिती निरंक असल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी ग्रापापु विभाग, जि.प. चंद्रपूर यांनी अपिलार्थीस सुचीत कले आहे. शिक्षण विभागाच्या वतीने कोणताही प्रतिसाद देण्यात आलेला नसल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी त्यांच्या कार्यालयीन अभिलेखावर दस्ताऐवज स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती ही अपिलार्थीस सदर आदेश प्राप्त होताच २ आठवडयाच्या आत विनामुल्य प्रदान करावी. या प्रकरणातील माहिती उपलब्ध नसल्यास माहिती निरंक असे अपिलार्थीस स्पष्टपणे कळविण्यात यावे, या निर्देशासह प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ३०.०१.२०२४**

जावक क्रमांक ---1961--- दिनांक ---1 APR 2024---